# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक क्र. 152 /२०२२

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विविध विद्याशाखांचे अभ्यासक्रम सुरू होण्यास विलंब झाल्याने सदर अभ्यासक्रम संपुष्टात येण्यास अधिकचा कालावधी लागत असल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ हे दिनांक ३१ मे, २०२२ रोजी संपण्याऐवजी पुढे गेलेले आहे. अनेक विभागांमध्ये शिक्षकांचे अभ्यासक्रम पूर्ण झालेले नाही त्यामुळे परीक्षा व मूल्यमापनाची प्रक्रीया अद्याप संपलेली नाही अशा स्थितीमध्ये तात्पुरत्या/करार पध्दतीने नियुक्त केलेल्या सहायक प्राध्यापकांची मुदत संपत असल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होणार असल्याचे काही शैक्षणिक विभागाच्या विभागप्रमुखांनी निदर्शनास आणून दिले आहे.

या संदर्भात मा.अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये ११ महिन्यांच्या करारपध्दतीने नियुक्त केलेल्या सहायक प्राध्यापक पदांची दिनांक ३१ मे, २०२२ रोजी संपत असलेली मुदत ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत अथवा शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी मंजूर करण्यात आलेली सहायक प्राध्यापकांची पदे रितसर प्रक्रिया करुन भरेपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यात येत आहे. परंतू, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत सदर नविन उमेदवारांच्या नियुक्तीची प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक आहे.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
जा. क्र. एटी/६०८ )
दिनांक : ३१ / ०५ /२०२२ )

(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)
**कुलसचिव**

प्रत माहितीसाठी :

१. मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा,
२. मा. संचालक, विद्यापीठ प्रशाळा,
३. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग,
४. मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग.

D:\Nitin Office\2020\Circular.docx